CNRMHAH2500 0676 2009

**नियमित दिवाणी दावा क्र. २४५/२००९ मधील निशाणी ३१ वरील आदेश**

(कोमल पठारे वि. गिताराम पठारे)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश-६, नियम-१७ अन्वये दाखल केलेला आहे.

अर्जाची थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे :-

२. वादींनी दावा मिळकतीचे वाटप व ठरावासाठी केलेला दावा प्रलंबित आहे. वादी क्र.१ दावा चालू असताना सज्ञान झाली आहे. प्रतिवादी क्र २ मयत झालेला आहे. त्यांचे नाव कमी करणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र १ याने दूसरा विवाह केलेला असून त्यास अपत्य झालेले आहे. त्याचे अपत्यांना दाव्यात पक्षकार म्हणून सामील करणे गरजेचे आहे. वादी क्र. २ हिचे नावास कंस करून, प्रतिवादी क्र. २ याचे नाव कमी करून प्रतिवादी क्र. ३ नर्मदा सहादू पठारे यांच्या नावासामरे नर्मदा उर्फ कमलाबाई अशी दुरूस्ती करण्याची तसेच प्रतिवादी क्र.१ यांच्या तीन अपत्यांना दाव्यात पक्षकार म्हणून सामील करण्याची परवानगी मागितली आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होत नाही. त्यांनी शेवटी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे देउन अर्जास जोरदार हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्ज खरा व बरोबर नाही. वादींनी मुदतीत अर्ज दिलेला नाही. अर्ज कायद्याने चालणारा नाही. त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. अर्ज मंजूर केल्यास वादींना खर्च आकारण्याची मागणी केलेली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. सदर दावा वाटप व वेगळा ताबा मिळण्याकामी दाखल केलेला आहे. वादी दावा मिळकत एकत्र कुटुबांची अविभक्त मिळकत असल्याचे कथन घेउन आलेला आहे. प्रतिवादींनी दाव्यास लेखी म्हणणे दाखल केलेले आहे. उभयपक्षकरांच्या परस्पर विरोधी कथनावंरून नि.१५ वर दि. ०४/०२/२०१२ रोजी वाद मुद्दे निश्चीत केलेले आहेत. दाव्याच्या सुनावणीस सुरूवात झालेली आहे. दावा दाखल करताना वादी क्र १ अज्ञान होती. तिचेवतीने तिची आई विमल पठारे यांचेतर्फे सदर दावा दाखल केलेला आहे. दावा प्रलंबित असताना वादी क्र १ सज्ञान झालेली आहे. वादींनी तशी दुरूस्ती यापूर्वीच केलेली आहे. प्रतिवादी क्र. २ मयत झालेला आहे. वादी त्यांना दाव्यातून कमी करू इच्छित आहे. त्यामुळे वादी क्र २ यांचे नाव कमी करण्याची परवानगी देणे योग्य होणार आहे.

५. वादींच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र १ याने दूसरा विवाह केलेला असून त्यांना अपत्य झालेले आहे. वादी सदर अपत्यांना दाव्यात पक्षकार म्हणून सामील करण्याची परवानगी मागत आहे. प्रतिवादी क्र ३ यांचे नावासमोर नर्मदा उर्फ कमलाबाई अशी दुरूस्ती करण्याचीही वादी परवानगी मागत आहे. दावा एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचे वाटप करून मिळण्याबाबत असल्याने प्रतिवादी क्र १ याचे वारसही दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. वादींनी मागितलेली दुरूस्ती सदर प्रकरणाचा निकाल एकाच वेळी गुणावगुणावर करण्यासाठी उपयोगाचे ठरणार आहे.

६. सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. वादीने मागितलेल्या दुरुस्त्या नाकारल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट सदर दुरुस्ती अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या हक्कावर कोणतीही गदा येणार नाही. दावा स्थावर मिळकतीबाबतचा असल्यामुळे त्यामध्ये उभय पक्षांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. सदर प्रकरणातील सर्व वाद एकाचवेळी गुणावगुणावर निकाली करणेसाठी दुरुस्ती अर्ज मंजुर करणे योग्य व न्यायोचित होणार आहे. अर्ज दाखल करण्यास झालेला उशीरामुळे प्रतिवादींना खर्च मिळणे आवश्यक आहे. सबब, वरील सर्व विवेचनावरुन मी खालील आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज निशाणी-३१ वादीने प्रतिवादींना खर्च रु. ५००/- देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादींनी पुढील तारखेदिवशी किंवा त्यापूर्वी प्रस्तावित दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याच्या प्रती पुढील तारखेला किंवा त्यापूर्वी सादर कराव्यात.

दिनांक : १५/०७/२०१९ ( वैभव क. जाधव )
ठिकाण : पारनेर दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पारनेर

I affirm that the contents of this PDF file order are same word to word as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the stenographer | Thorat U. B. |
| Name of the Court | Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Parner |
| Date of dictation | 15-07-2019 |
| Order signed by PO on | 15-07-2019 |
| Order uploaded on | 15-07-2019 |